Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.III/April; 12pp.1-4 डॉ. भालचंद्र रूपराव देशमुख ISSN:-2230-7850

Research Papers

# महिला आरक्षण बिलः सद्यस्थिती व आवष्यकता

डॉ. भालचंद्र रूपराव देशमुख
सहाय्यक प्राध्यापक,
जी.एन.आझाद समाजकार्य
महाविद्यालय पुसद

प्रस्तावना :—

भारतात जनगणना 2011 च्या आकडेवारीनुसार महिलांची संख्या जवळपास एकूण लोकसंख्येच्या निम्मे (एकूण लोकसंख्या—1,210,193,422 महिला—586,469,174) असून 'मतदार' संख्येमध्ये सुध्दा त्या पुरूषांच्या तुलनेत फार मागे नाहीत. भारतीय निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार (2009) भारतात एकूण मतदार 71,69,85,101 असून त्यापैकी महिला मतदारांची संख्या 34,22,26,300 (48 टक्के) होती. पुरूशांऐवढीच मतदार संख्या व भारतीय राज्यघटनेनुसार मतदानाच्या बाबतीत स्त्री पुरूषांना समान अधिकार प्रदान केलेले असले तरी मात्र राजकीय क्षेत्रात महिलांचा केवळ मतदार म्हणूनच उपयोग केला जात आहे. भारतीय स्वातंत्र्य लढयात पुरूषांच्या बरोबरीने महिलांनी सुध्दा सहभाग नोंदविलेला असला तरी मात्र स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सत्तेतील वाटा देत असतांना त्यांना सामावून घेतल्या गेले नाही.

त्यामुळे महिलांविषयी आखल्या गेलेले धोरण पुरुषी अहंकारातून असून त्यातून महिलांचा विकास होऊ शकलेला नाही. ही बाब ओळखता तत्कालीन देवेगौडा सरकारने महिलांना सत्तेत वाटा देण्याच्या उद्येशाने सन 1996 मध्ये महिला आरक्षण बिल संसदेत मांडले ज्यामध्ये महिलांसाठी 33 टक्के आरक्षणाची व्यवस्था केल्या गेली होती. जवळपास 16 वर्षाच्या प्रदिर्घ प्रवासानंतर सुध्दा हे बिल अद्यापही पास होण्याची वाट पाहात असून त्यासंदर्भात अद्यापही स्थिती स्पश्ट झालेली नाही. प्रस्तूत शोध निबंधातून महिला आरक्षण बिला संदर्भात सद्यस्थितीचा आढावा घेऊन भारतीय संसदेत महिलांची संख्या अभ्यासून आरक्षणाची आवश्यकता विषद केलेली आहे.

महिला आरक्षण बिल—संकल्पना व सद्यस्थिती

जागतीक पातळीवरील महिलांचा राजकीय सहभाग लक्षात घेतल्यास भारतात महिलांचा राजकिय सहभाग नगण्य असल्याचे सिध्द होते. पार्लमेंटमधील महिलांचा सहभागासंदर्भात 'इंटर पार्लमेंटरी युनीयन ऑर्गनायझेशन' (2011) द्वारा प्रसिध्द केलेल्या 188 देशाच्या यादीत भारत 99 व्या स्थानावर आहे.ही परिस्थिती बदलण्याच्या हेतूने 'व्होटींग' च्या बाबतीत पुरूषांच्या संख्येने असलेल्या महिलांना राजकारणात प्रवेश देऊन त्यांचा संसदेतील हिस्सा निश्चीत करण्याच्या उद्येशाने सन 1996 मध्ये देवगौडा सरकारने महिलांसाठी 33 टक्के आरक्षण मान्य करून त्यासंदर्भात संसदेत बिल सादर केले. हे बिल 'महिला आरक्षण बिल' म्हणून ओळखण्यात येते. या बिलाच्या माध्यमातून संसद ते स्थानीक प्रशासना मध्ये (पंचायत स्तर) महिलांना 33.3 टक्के आरक्षण मान्य केल्या जानार होते. तत्पुर्वी 73 व्या घटना दुरूस्तीच्या माध्यमातून स्थानीक प्रशासनामध्ये महिलांना 33 आरक्षण मान्य केले असून महाराष्ट्रासह अन्य काही राज्यांनी हे आरक्षण वाढवून 50 टक्केपर्यंत नेले आहे. परंतू संसद तथा विधानसभे मधिल 33 आरक्षणाला अदयापही मान्यता दिल्या गेलेली नाही.

### *महिला आरक्षण बिल ऐतीहासीक आढावा*

सन 1996 मध्ये देवे गौडा सरकारणे 81 वी घटना दुरूस्ती करून आरक्षण बिल संसदेत सादर केले. परंतू देवेगौडा सरकारला फारसा वेळ मिळू न शकल्यामुळे हे बिल पास होऊ शकले नाही. 1998 मध्ये 12 व्या लोकसभेत अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वातील 'एनडीए' सरकारने हे बिल पुन्हा सादर केले. परंतू वाजपेयी सरकारला सुध्दा फारसा कालावधी न मिळाल्यामुळे हे बिल पास होऊ शकेल नाही. तेंव्हा 1999 मध्ये 13 व्या लोकसभेत हे बिल पुनः मांडल्या गेले. तद्नंतर सन 2002 मध्ये या बिलाला राज्यसभेत सादर केल्या नंतर तिथे हे बिल नाकारल्या गेले.

2003 मध्ये हे बिल दोनदा राज्यसभेत मांडल्या गेले व 2004 मध्ये 'युपीए' सरकारने या बिलाचा 'कॉमन मिनीमम प्रोग्राम' मध्ये समावेश करून, सन 2008 मध्ये राज्यसभेत मांडले. सन 2010 मध्ये या बिलाच्या संदर्भात कॅबिनेट मध्ये निर्णय घेऊन पुनः राज्यसभेत सादर केले. यावेळी या बिलाच्या संदर्भात प्रचंड गोंधळ निर्माण केल्या गेला (टाईम्स ऑफ इंडीया, 2010). ज्यातून राज्यसभा सहा वेळा तहकुब करावी लागली. 9 मार्च 2010 मध्ये शेवटी राज्यसभेत हे बिल पास केल्या गेले. गोंधळाच्याच स्थितीत 186 संसद सदस्यांनी बिलास मान्यता दिली तर एक मत विरोधात गेले. तृणमुल कॉंग्रेसचे सांसद अनुपस्थित राहिलेत, तर बहुजन समाज पार्टिच्या सदस्यांनी बहिर्गमन केले.

**Please cite this Article as :** *डॉ. भालचंद्र रूपराव देशमुख*, *महिला आरक्षण बिलः सद्यस्थिती व आवष्यकता* : **Indian Streams Research Journal (April ; 2012)**

लालुप्रसाद यांच्या जनता दल व मुलायम सिंग यांचा समाजवादी पक्ष या बिलाच्या विरोधात असून ज्या पक्षांचे प्रमुखपदी महिला आहेत; म्हणजेच तृणमुल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी व बहुजन समाज पार्टिच्या मायावती, तामीळनाडुतील जयललीता यांनी सुध्दा या बिलाच्या समर्थनार्थ पुढे येऊ नये यातूनच बिलाच्या भविष्याची प्रचिती येते व 16 वर्षानंतर सुध्दा हे बिल पास का होऊ शकले नाही याचे संभाव्य उत्तर सुध्दा मिळते. सध्यस्थितीत हे राज्यसभेत पास झाले असून लोकसभेच्या मंजुरीसाठी ठेवलेले आहे(आयडब्ल्युआरबी 2010).

### *महिला आरक्षणाची आवश्यकता–*

भारतीय संस्कृतीत महिलांना अर्धांगिनीचा दर्जा दिलेला असला, अथवा तिला देवीची उपमा देऊन पुजन केल्या जात असले, तरी समाजव्यवस्थेत तिचे स्थान नेहमीच दुय्यम राहात आलेले आहे. स्वातंत्र्य पुर्व काळातील 'मनुविचारधारा' व त्यातून निर्माण झालेली समाजव्यवस्था यामध्ये महिलांचे सर्व अधिकार अमान्य केलेत. तर स्वातंत्र्यानंतर स्विकारल्या गेलेल्या राज्यघटनेमध्ये महिलांना समान अधिकार प्रदान केलेले असले, तरी मात्र राजकिय दृष्टया त्यांच्या वाटयाला उपेक्षाच आली. सारणी 1 मध्ये स्पष्ट दिसून येते की, पहिल्या लोकसभेत महिला सांसद सदस्यांचे प्रमाण केवळ 4.40 टक्के होते. या सारणीत एक बाब सकारात्मक दिसून येते, ती म्हणजे महिलांच्या विजयाचे प्रमाण 45 टक्केच्या वर होते. 499 संख्येच्या पहिल्या लोकसभेत 51 महिलांनी निवडणूक लढविली. त्यामध्ये 22 महिला निवडून आल्यात. परंतू महिलांच्या विजयाचे प्रमाण जरी अधिक दिसून येत असले तरी मात्र केवळ 51 महिलांनी निवडनूक लढविण्यातून त्याकाळातील समाजव्यवस्थेची मानसिकता स्पष्ट होते.

दुसऱ्या लोकसभेतील चित्र सुध्दा फारसे बदल्याचे दिसून येत नाही. 500 संख्या असलेल्या लोकसभेत यावेळी महिलांचे प्रमाण केवळ 5.40 टक्के होते. यावेळी पहिल्या लोकसभेपेक्षा प्रमाण वाढलेले दिसून येत असले तरी मात्र महिलांच्या निवडून येण्याचे प्रमाण मात्र घसरल्याचे दिसून येते. 70 महिलांनी निवडणूक लढविली त्यापैकी 27 म्हणजेच 38.57 टक्के महिला निवडून आल्यात तर तिसऱ्या व चवथ्या लोकसभेत एकूण निवडणूक लढविलेल्या महिलांपैकी अनुकमे 51.47(68 पैकी 35) व 48.43 (66 पैकी 31) टक्के महिला निवडून आल्यात. यानंतर मात्र प्रत्येक लोकसभेत महिलांच्या निवडून येण्याचे प्रमाण सतत घसरत गेले. पाचव्या लोकसभेत 86 महिलांनी निवडणूक लढविली त्यापैकी 22 महिला निवडून आल्यात तर सहाव्या लोकसभेत 70 पैकी 19 महिला निवडून येऊ शकल्या. सातव्या ते पंधराव्या लोकसभेत निवडूणक लढविणाऱ्या एकूण महिलांपैकी निवडून येण्याचे प्रमाण अनुकमे 19.70, 28.30, 14.80, 10.75, 8.14, 15.86, 17.25, 14.36, 10.61 टक्के होते. या आकडेवारीवरून स्पष्ट दिसून येते की महिला 'व्होटरची' संख्या जरी पुरूषांच्याच बरोबरीने असली तरी मात्र त्यांचे निवडूण येण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. परिणामतः संसदेतील महिला सदस्यांचे प्रमाण प्रत्येक लोकसभेत अत्यल्पच राहिले.

सारणी 1
लोकसभेतील महिला उमेद्वार व संसदेतील प्रमाण

| लोकसभा | महिला उमेद्वार | निवडून आलेल्या उमेद्वार | निवडणूक लढविलेल्या एकूण महिला उमेद्वाराशी शे.प्रमाण | एकूण सिट | संसदेतील महिलांचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम | 51 | 22 | 45.09 | 499 | 4.40 |
| द्वितीय | 70 | 27 | 38.57 | 500 | 5.40 |
| तृतीय | 68 | 35 | 51.47 | 503 | 6.70 |
| चवथी | 66 | 31 | 48.43 | 523 | 5.90 |
| पाचवी | 86 | 22 | 27.50 | 523 | 4.20 |
| सहावी | 70 | 19 | 27.70 | 544 | 3.40 |
| सातवी | 142 | 28 | 19.70 | 544 | 5.14 |
| आठवी | 162 | 44 | 28.30 | 525 | 7.90 |
| नववी | 189 | 28 | 14.80 | 503 | 9.30 |
| दहावी | 307 | 33 | 10.75 | 543 | 6.60 |
| अकरावी | 491 | 40 | 08.14 | 543 | 7.36 |
| बारावी | 271 | 43 | 15.86 | 543 | 8.07 |
| तेरावी | 284 | 49 | 17.25 | 543 | 9.51 |
| चवदावी | 355 | 45 | 14.36 | 543 | 9.50 |
| पंधरावी | 556 | 59 | 10.61 | 543 | 10.50 |

स्त्रोतः भारतीय निवडणूक आयोग 2009

### *राज्यसभेतील महिला सदस्यांची संख्या*

लोकसभा हे कनिष्ठ सभागृह असून यातील सदस्यत्व प्रत्यक्ष लोकमततातून प्राप्त होत असते. भारतीय समाजव्यवस्था पुरूषप्रधान असल्यामुळे लोकसभेत महिला सदस्य निवडून येऊ शकल्या नाहीत, असा जर तात्वीक विचार मांडल्यास राज्यसभेत महिलांना समान प्रतिनिधीत्व मिळणे आवश्यक होते. कारण या वरिष्ठ सभागृहात सदस्यत्व हे अप्रत्यक्ष निवडणूकिद्वारे प्राप्त होत असते. म्हणजेच लोकमततातून निवड होत नसून राज्यनिहाय सभागृहातून ही निवड होत असते. या सभागृहात उभी असलेला व्यक्ती निवडून येण्याची शंभर टक्के शाश्वती असते. परंतू या सभागृहात सुध्दा महिलांची उपेक्षा केल्या गेली असून निवडून येण्याची शाश्वती जरी असली, तरी मात्र राजकिय पक्षांनी महिलांना उमेद्वारी नाकारल्यामुळे या सभागृहात सुध्दा संख्या नगण्यच दिसून येते. सारणी 2 मधील राज्यसभेच्या महिला सदस्यांच्या (सन 1952 पासून ते 2008 पर्यंतच्या) आकडेवारीवर प्रकाश टाकल्यास स्थितीचा बोध होतो. सन 1980 मध्ये सर्वाधिक 29 महिला राज्यसभेच्या सदस्य होत्या हे प्रमाण एकूण सदस्य संख्येच्या 11.98 टक्के होते. हे वर्ष वगळता अन्य कोणत्याही वर्षी महिलांना समाधानकारक प्रतिनिधीत्व दिल्याचे दिसून येत नाही.

सारणी 2
राजसभेतील महिला सदस्य (1952 ते 2008)

| वर्ष | सदस्य संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| 1952 | 15 | 6.94 |
| 1954 | 17 | 7.79 |
| 1956 | 20 | 8.62 |
| 1958 | 22 | 9.52 |
| 1960 | 24 | 10.25 |
| 1962 | 18 | 7.62 |
| 1964 | 21 | 8.97 |
| 1966 | 23 | 9.82 |
| 1968 | 22 | 9.64 |
| 1970 | 14 | 5.85 |
| 1972 | 18 | 7.40 |
| 1974 | 18 | 7.53 |
| 1976 | 24 | 10.16 |
| 1978 | 25 | 10.24 |
| 1980 | 29 | 11.98 |
| 1982 | 24 | 10.16 |
| 1984 | 24 | 10.24 |
| 1986 | 28 | 11.98 |
| 1988 | 25 | 10.59 |
| 1990 | 24 | 10.34 |
| 1992 | 17 | 7.29 |
| 1994 | 20 | 8.36 |
| 1996 | 19 | 7.81 |
| 1998 | 19 | 7.75 |
| 2000 | 22 | 9.01 |

### *राष्ट्रीय पक्षातर्फे महिलांची उमेद्वारी*

लोकसभेच्या निवडणुकीत राजकीय पक्षांनी महिलांना उमेद्वारी देतांना प्रत्येकवेळाच दुर्लक्ष केले आहे. सारणी 3 मधिल पहिल्या लोकसभेपासून ते पंधराव्या लोकसभेपर्यंतच्या आकडेवारीवर प्रकाश टाकला असता ही बाब अधिक स्पष्ट होते. लोकसभेच्या एकूण सिटसाठी राजकीय पक्षांनी महिलांना दिलेली उमेद्वारी असे दर्शविते की, आजपर्यंत सर्व राजकीय पक्षांनी महिलांना दिलेल्या उमेद्वारीची आकडेवारी एकत्र केल्यानंतर सुध्दा 25 टक्केच्या वर ती आकडेवारी जात नाही. राजकिय पक्षांची उमेद्वारी यासाठी महत्वपुर्ण ठरते की, लोकसभेसाठी उभ्या असलेल्या एकूण महिला उमेद्वारांपैकी निवडून आलेल्या महिला उमेद्वारांमध्ये सर्वाधिक प्रमाण हे राजकीय पक्षांच्या उमेद्वार म्हणूनच आहे. याचाच अर्थ, अपक्ष महिला उमेद्वार निवडणूकीत टिकाव धरू शकत नाही. तेंव्हा जर राजकीय पक्षच महिलांना अत्यल्प उमेद्वारी देत असतील तर त्यांचे संसदेतील प्रमाण वाढणे शक्य नाही. स्वातंत्र्यानंतर झालेल्या एकूण 15 लोकसभा निवडणूकांमध्ये हे स्पष्ट झाले आहे की, महिलांना कोणत्याही प्रकारचे आरक्षण नसल्यामुळे त्यांना राजकीय पक्ष सुध्दा लक्षात धरत नाहीत. जर महिलांना आरक्षण दिल्या गेले तर राजकिय पंक्षाना सुध्दा ते बंधनकारक असणार आहे. तेंव्हा महिलांचे संसदेतील प्रमाण वाढविण्यासाठी महिला आरक्षण बिल पास करून त्यांना राजकीय आरक्षण देणे हाच एक पर्याय ठरतो.

**Please cite this Article as :** *डॉ. भालचंद्र रूपराव देशमुख*, *महिला आरक्षण बिलः सद्यस्थिती व आवष्यकता* : **Indian Streams Research Journal (April ; 2012)**

सारणी 3
राजकीय पक्षांद्वारे निवडणूक लढविलेल्या उमेद्वार

| निवडणूक | एकूण सिट | एकूण महिला उमेद्वार | राजकिय पक्षांद्वारे महिला उमेद्वार (एकूण सिट–प्रमाण) | एकूण निवडूण आलेल्या उमेद्वार | राजकिय पक्षाच्या उमेद्वारीवर निवडूण आलेल्या महिला उमेद्वार |
|---|---|---|---|---|---|
| 6 वी लोकसभा | 544* | 70 | 41(7.53)* | 19 | 17 |
| 7वी लोकसभा | 544 | 143 | 77(14.15) | 28 | 27 |
| 8वी लोकसभा | 544 | 162 | 63(11.58) | 42 | 39 |
| 9वी लोकसभा | 525 | 198 | 87(16.57) | 29 | 26 |
| 10वी लोकसभा | 503 | 314 | .... | 44 | ..... |
| 11वी लोकसभा | 543 | 599 | 125(23.02) | 40 | 36 |
| 12वी लोकसभा | 543 | 274 | 107(19.70) | 43 | 31 |
| 13वी लोकसभा | 543 | 284 | 104(19.15) | 49 | 35 |
| 14वी लोकसभा | 543 | 355 | 110(20.25) | 50 | 30 |
| 15वी लोकसभा | 543 | 556 | 139(25.59) | 59 | 43 |

स्त्रोतः इलेक्शन कमीशन ऑफ इंडिया, जनरल इलेक्शन 2009,
राज्यसभा सेक्रेटरी ओकेजनल पेपर 2008
'कंसातील आकडेवारी एकूण लोकसभेच्या सिटच्या तुलनेत राजकीय पक्षांनी महिलांना दिलेल्या उमेद्वारीचे शेकडा प्रमाण दर्शविते.

***निष्कर्ष***

निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार एकूण मतदारांपैकी 48 टक्के 'मतदार' हया महिला आहेत. याआधारे त्यांचे संसदेतील प्रमाण जवळपास 50 टक्के असावयास हवे होते. जे आजपर्यंतच्या झालेल्या एकूण 15 लोकसभा निवडणूकित 10 टक्केच्या वर सुध्दा जाऊ शकले नाही. तर राज्यांमधील विधानसभेमध्ये सुध्दा चित्र यापेक्षा निराळे नाही. देशातील एकूण 4030 विधानसभा सिटपैकी केवळ 311 सिट वर महिला सदस्य आहेत, ही टक्केवारी जवळपास 8 टक्के आहे (जीओव्ही.कॉम).ही बाब लक्षात घेता 73 व्या घटनादुरूस्तीनुसार 1993 मध्ये पंचायत मध्ये महिलांना 33 टक्के आरक्षरण मंजुर केले. ज्याआधारे हजारो महिलांचा राजकारणात प्रवेश झाला व त्या चांगले शासन देत आहेत. त्याच वेळी 1988 मध्ये 'नॅशनल प्रेस्पक्टीव्ह प्लॅन फॉर वुमेन' केलेल्या सुचनेनुसार महिलांसाठी 30 टक्के आरक्षणाच्या चर्चेला प्रारंभ झाला व 1995 मध्ये हा आरक्षण कोटा वाढवून 33 टक्के करावा असा आवाज उठविण्यात आला ज्याआधारे 11 व्या लोकसभेत 1996 मध्ये देवेगौडा सरकारने 'महिला आरक्षण बिल' संसदेत मांडले. परंतू राजकीय पक्षांच्या अनिच्छेतून अदयापही पास होऊ शकलेले नाही. एकतर राजकीय पक्ष महिलांना अधिक प्रमाणात उमेद्वारी दयायला इच्छुक नाहीत व दुसरीकडे आरक्षण बिलाचे समर्थन सुध्दा करीत नाहीत. त्यातून संसदेतील महिलांची संख्या कमी राहून महिलांसदर्भात धोरण ठरविण्यात अपयश येत आहेत, ज्यातून अदयापही महिला दुर्बल जिवन जगत आहेत. यशस्वी धोरण आखण्यासाठी व अमंलबजावनीसाठी संसदेतील महिलांची संख्या वाढणे, अत्यंत आवश्यक आहे. जे केवळ आरक्षणच्या माध्यमातून शक्य आहे. तेंव्हा महिला आरक्षण बिल पास करून त्यांना न्याय देणे हाच पर्याय योग्य ठरतो. हे बिल पास झाल्यास 181 महिला, लोकसभेत तर 28 राज्यांमधिल एकूण 4109 विधानसभा सिटपैकी 1370 ठिकाणी निवडूण येतील. ज्याआधारे त्या महिलांच्या विकासाच्या दृष्टिने यशस्वी धोरण आखतील.

***संदर्भ***

1.जनगणना 2011.विकीपीडीया.कॉम
2.वुमेन इन नॅशनल पार्लमेंट 2011.'इंटर पार्लमेंटरी युनीयन ऑर्गनायझेशन' 31 ऑगस्ट
3.गव्हर्नमेंट ऑफ इंडिया.कॉम.
4.टाईम्स ऑफ इंडीया.कॉम. 2010.दि.20 मार्च 2012
5.रिझर्वेशन ऑफ स्टेटस वुमेन इन लेजीसलेटीव्ह बॉडीजः प्रेस्पेक्टीव्हज. 2008. राज्यसभा सेक्रेटरी, दिल्ली,
6.ओकेजनल पेपर सिरीज.
7.इंडीया–वुमेन रिझर्वेशन बिल 2010– दि निड फॉर इंडिया–कंम्पीट केस स्टडी 2010.9 मार्च.रिआलिटीज
8.व्हयुज.ब्लॉगपोस्ट.कॉम

**Please cite this Article as :** *डॉ. भालचंद्र रूपराव देशमुख*, *महिला आरक्षण बिलः सद्यस्थिती व आवश्यकता* **: Indian Streams Research Journal (April ; 2012)**